# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग दोन

**दिनांक ४ ऑगस्ट, २०२० / श्रावण १३, १९४२ शके**
**संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.५८, दिनांक १९ जून, २०२०**

७१. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०२० रोजी विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विधानसभेचे सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजीपासून सुरु होणारे आगामी तृतिय (पावसाळी) अधिवेशन आता सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून विधानभवन, मुंबई येथे होणार असून सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ते शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२० या कालावधीसाठी **दिनांक १९ जून, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांच्या चक्रानुक्रमानुसार या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांच्या सूचना व्यपगत न होता त्या आहे तशाच कार्यवाहीत राहतील.** सुधारित कार्यक्रमानुसार सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ते शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२० या कालावधीतील तारांकित स्वीकृत प्रश्न संबंधित गटासाठी सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२० या कालावधीत उपलब्ध होणाऱ्या पुढील दिनांकांस उत्तरासाठी ठेवण्यात येतील. त्यानुसार सदरहू अधिवेशनासाठी मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याच्या अखेरच्या दिनांकात विधानसभा नियम ७४ नुसार सुधारणा करण्यात आली असून, मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२० रोजीपासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन **(ONLINE)** पद्धतीने तारांकित प्रश्न सूचना स्विकारण्यात येतील. याबाबतचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेला आहे.

पहिल्या आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यांतील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव / अवर सचिव यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

:: वि व र ण प त्र ::

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | १) उप मुख्यमंत्री<br>२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>४) ग्रामविकास मंत्री<br>५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>६) महिला व बालविकास मंत्री<br>७) मृद व जलसंधारण मंत्री | सोमवार, ०३ ऑगस्ट, २०२०<br>सोमवार, १० ऑगस्ट, २०२०<br>*सोमवार, १७ ऑगस्ट, २०२० | सोमवार, ०७ सप्टेंबर, २०२०<br>सोमवार, १४ सप्टेंबर, २०२०<br>*सोमवार, २१ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| दोन | १) मुख्यमंत्री<br>२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>३) गृहनिर्माण मंत्री<br>४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | मंगळवार, ०४ ऑगस्ट, २०२०<br>मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२०<br>*मंगळवार, १८ ऑगस्ट, २०२० | मंगळवार, ०८ सप्टेंबर, २०२०<br>मंगळवार, १५ सप्टेंबर, २०२०<br>*मंगळवार, २२ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |
| तीन | १) गृह मंत्री<br>२) महसूल मंत्री<br>३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | बुधवार, ०५ ऑगस्ट, २०२०<br>बुधवार, १२ ऑगस्ट, २०२०<br>*बुधवार, १९ ऑगस्ट, २०२० | बुधवार, ०९ सप्टेंबर, २०२०<br>बुधवार, १६ सप्टेंबर, २०२०<br>*बुधवार, २३ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |
| चार | १) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>३) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>४) शालेय शिक्षण मंत्री<br>५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री<br>६) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री | गुरुवार, ०६ ऑगस्ट, २०२०<br>गुरुवार, १३ ऑगस्ट, २०२०<br>*गुरुवार, २० ऑगस्ट, २०२० | गुरुवार, १० सप्टेंबर, २०२०<br>गुरुवार, १७ सप्टेंबर, २०२०<br>*गुरुवार, २४ सप्टेंबर, २०२० | सोमवार, १० ऑगस्ट, २०२०<br>सोमवार, १७ ऑगस्ट, २०२०<br>*सोमवार, २४ ऑगस्ट, २०२० |
| पाच | १) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>३) ऊर्जा मंत्री<br>४) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री<br>६) आदिवासी विकास मंत्री<br>७) सहकार, पणन मंत्री<br>८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० | शुक्रवार, ११ सप्टेंबर, २०२०<br>शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२०<br>*शुक्रवार, २५ सप्टेंबर, २०२० | मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२०<br>मंगळवार, १८ ऑगस्ट, २०२०<br>*मंगळवार, २५ ऑगस्ट, २०२० |

* **आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० या कालावधीत वाढ झाल्यास पुर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.**

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा

**प्रति,**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्मा.सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.